महाराष्ट्र शासन
प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु एक्सलसियंर
इमारत, ए. के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दुरध्वनी : ०२२ - २२०१६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org

प्रनिप्रा/निव्वळ कत्राटी भरती/ 1129 दिनाक- 10 SEP 2025

## जाहीर नोटीस

प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयातील संगणकीय प्रणालीच्या कामकाजाच्या अनुषंगाने खालील कामाकरिता कंत्राटी पध्दतीने काम करण्यासाठी शासन विहित अटी-शर्तीनुसार विवक्षित कामासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पद | पदाची संख्या | पात्रता |
|---|---|---|---|
| १) | Programmer/ System Admin | १ (एक) | ज्या व्यक्तीने संगणक अभियांत्रिकी/संगणक तंत्रज्ञान/संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकी माहिती तंत्रज्ञान अभियांत्रिकीमधील बी.ई/बी.टेक पदवी किंवा एम.एस्सी आयटी किंवा एमसीए ही अर्हता धारण केलेली असेल. |

अटी व शर्ती,-

१) इच्छुक व आवश्यक अर्हता धारण करणा-या उमेदवारांनी सदर पदाकरीता दिनांक- 30 सप्टेंबर-२०२५ पर्यंत विहित नमुन्यात अर्ज (विवरणपत्रासह) ara@maha-ara.org या ई-मेल पत्त्यावर पाठवावा.

२) विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

३) प्राप्त झालेल्या अर्जाची आवश्यक ती पडताळणी करुन उमेदवाराची मुलाखत घेण्यात येईल तसेच उमेदवारांना मुलाखतीकरीता कोणताही प्रवासभत्ता देय राहणार नाही. उमेदवार निवडीबाबतचा अंतिम अधिकार प्रवेश नियामक प्राधिकरणाचा राहील.

४) Programmer/System Admin या पदावरील नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर व सुरुवातीला केवळ ११ महिन्याच्या कालावधीसाठी मर्यादित राहील.

५) शासकीय/निमशासकीय कार्यालयातील संगणकीय प्रणालीच्या कामकाजाचा किमान ३ ते ५ वर्षाचा अनुभव असावा.

६) सदर पदाकरीता प्रतिमाह पारिश्रमिक वेतन रु. रु ५०,०००/- (पंन्नास हजार फक्त) देण्यात येईल.

७) उमेदवाराचे कामकाज कोणत्याहीवेळी असमाधानकारक आढळल्यास एक महिन्याची पुर्व सूचना देऊन सेवा समाप्त करण्यात येईल.

८) अधिक माहितीसाठी: ०२२-२२०१६१५३ /५७/५९ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

(दिलीप सरदेसाई भा.प्र.से)
सदस्य सचिव,
प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई

D:\Yogesh\Mohan Tambe Renew Order-२०२४.docx

## अर्जाचा नमुना

## प्रोग्रामर /सिस्टम ॲडमिन निव्वळ कंत्राटी पध्दतीने कर्मचारी यांची नियुक्ती करण्याकरिता अर्ज.

अर्जदाराने अलीकडील काळातील स्वत :चे छायाचित्र येथे चिकटवावे

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अर्जदाराचे संपूर्ण नाव | : | ------------------------------------------------- |
| २) | जन्म दिनांक व वय | : | ----/----/------ |
| ३) | शैक्षणिक अर्हता | : | |
| ४) | तांत्रिक पदाचा अनुभव | : | ------------------------------------------------- |
| ५) | अर्जदाराचा पत्ता | : | ------------------------------------------------- |
| ६) | भ्रमणध्वनी क्रमांक | : | ------------------------------------------------- |
| ०७) | ईमेल | : | ------------------------------------------------- |
| ०८) | आवश्यक असलेली अर्हता अर्जदारास आहे काय? | : | होय / नाही |

महाराष्ट्र अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियम) अधिनियम २०१५ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयात निव्वळ कंत्राटी तत्वावर Programmer/System Admin १ या पदाकरिता प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात / सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील /सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :

दिनांक : **अर्जदाराची स्वाक्षरी**

सहपत्रे : सर्व आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रे

(टिप : उपरोक्त नमूद माहिती आवश्यक असल्याने संपूर्ण माहिती सादर करणे अनिवार्य आहे.